सुभाषित -

रत्नैर्महाब्धेस्तुतुषुर्न देवा न भेजिरे भीमविषेण भीतिम् |

सुधां विना न प्रययुर्विरामं न निश्चितार्थाद्विरमन्ति धीरा: ||

अर्थ -

(समुद्रमंथनाच्या वेळी) अतिशय मौल्यवान रत्ने निघाली म्हणून देव हरखून गेले नाहीत आणि महाभयंकर असे हलाहल निघाले म्हणून ते घाबरले नाहीत. अमतप्राप्तीचे ध्येय साध्य होईपर्यंत त्यांनी आपले प्रयत्न थांबविले नाहीत. धैर्यशाली लोक निश्चित ठरविलेल्या कार्यापासून ढळत नाहीत.